# जाहीर नोटीस

**सर्व लोकास कळविण्यात येते की, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, अंतर्गत निम्न ज्ञानगंगा -२ बृहत लघु-पाटबंधारे योजना ता. खामगाव जि. बुलडाणा,**

करीता मौजे निमकवळा व दिवठाणा, ता. खामगाव जि. बुलडाणा येथील जमीनी सरळ खरेदी व्यवहाराने , खाजगी जमीनीची खरेदी करण्याचे प्रस्तावित असल्याने त्याबाबतच्या आक्षेप व हरकती मागविण्याबाबतची सदरची जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहे. सोबत प्रसिध्दीस दिलेल्या यादीतील जमीन मालकांनी / भूधारकांनी व नमुद केलेल्या शेतजमीनीशी ज्यांचा हित संबंध आहे, अशा सर्व बँक , पतसंस्था, खाजगी व्यक्ती , वारस व इतर संबंधीत आदींचा समावेश आहे, असे अधिकारी अभिलेखावरून दिसते अशा सर्व लोकांनी/व्यक्तीनी ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरूपात आवश्यक त्या सर्व दस्ताऐवजासह खालील नमुद पत्त्यावर या बाबत आक्षेप व हरकती कार्यालयीन वेळेत लघु-पाटबंधारे विभाग, स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या मागे, बुलडाणा, जिल्हा बुलडाणा ( कार्यालय फोन नं. ०७२६२ – २४७९७९ ) येथे दाखल कराव्यात . उपरोक्त कालावधीनंतर येणा-या आक्षेप /हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदरील जमीनीचा सरळ खरेदी व्यवहार संबंधीताशी केला जाईल, याची नोंद घ्यावी. सोबत जमिनी मालकांची त्यांचे ७/ १२ नुसार गट निहाय प्रस्तावित खरेदी करावयाच्या क्षेत्रासह माहिती प्रसिध्दीस दिली आहे.

कार्यकारी अभियंता
लघु पाटबंधारे विभाग
बुलडाणा